N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** करवीर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0716 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 19:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 11/10/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/10/2023
      **Time From (वेळेपासून):** 12:23 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:09 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 13/10/2023 **Time (वेळ):** 19:20 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 068
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 19:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत प्रयाग चिखली येथील

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** एकनाथ विश्वास कांबळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्रयाग चिखली,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्रयाग चिखली,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता)**:**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोरख दिनकर गिरीगोसावी | | | 1. पंत मंदीर जवळ, शिवाजीनगर, कणेर,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक - 13/10/2023

मी एकनाथ विश्वास कांबळे, वय - 50 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. प्रयाग चिखली, ता. करवीर, जि. कोल्हापूर मो. नं. 9172782092 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 11/10/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे येवुन पोलीस उपअधीक्षक श्री. सरदार नाळे यांची भेट घेवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, मला बॅकेत कर्ज प्रकरण करण्याचे असल्याने मला माझ्या राहते घराचा गावठाण उतारा मिळणे आवश्यक असल्याने मी दि. 11/10/2023 रोजी 10.00 वा चे सुमारास ग्रामपंचायत कार्यालय प्रयाग चिखली, ता. करवीर येथे कार्यालयात जावुन ग्रामसेवक जी.डी.गिरीगोसावी यांना माझे घराचा गावठाण उतारा मिळणेसाठी अर्ज दिला होता. त्यावेळी ग्रामसेवक जी.डी.गिरीगोसावी यांनी माझ्याकडे गावठाण उतारा देणेसाठी 2000/- रूपयाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना 2000/- रूपये मध्ये काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी ग्रामसेवक जी.डी.गिरीगोसावी यांनी 2000/- रूपये मध्ये काही कमी जास्त होणार नाही असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना पैशांची जुळणा करून भेटतो असे सांगितले होते. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दि.11/10/2023 रोजी ग्रामसेवक गिरीगोसावी यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे ऑफिसकडील पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन माझे तक्रारीवर कारवाई करणेबाबत सांगितले. त्यानंतर मी साळुंके साहेब यांना माझी तक्रार सांगुन, तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यानंतर त्यांनी मला पंचगंगा घाट, कोल्हापूर येथे जावुन रोड कडेला थांबणेस सांगितले. त्यानंतर काही वेळाने साळुंके साहेब व त्यांचा स्टाफ तेथे आले. त्यावेळी साहेबांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन ग्रामपंचायत प्रयाग चिखली येथील ग्रामसेवक जी.डी.गिरीगोसावी यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना ग्रामसेवक गिरीगोसावी यांना भेटणेकरीता पाठविले. मी ग्रामपंचायम कार्यालय प्रयाग चिखली, ता. करवीर, जि.कोल्हापूर येथे जावून ग्रामसेवक गिरीगोसावी यांची भेट घेतली त्यावेळी आमचेत माझे घराचा गावठाण उतारा कोणत्या बॅकेचे कर्ज प्रकरण आहे याबाबत चर्चा झाली त्यावेळी मी पुन्हा त्यांना गावठाण उतारा मला देणेबाबत विचारणा केली असता त्यांनी मला हाताचे दोन बोटांनी पैश्याबाबत खुणवले त्यावेळी मी त्यांना किती दयायचे असे विचारले त्यावेळी गिरीगोसावी यांनी घेवुन या दोन, दोन घेवुन या असे म्हणाले त्यावेळी त्यावेळी मी दोन हजार ना असे विचारले त्यावेळी गिरीगोसावी यांनी होय असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना काही तरी कमी करा असे म्हणालो, त्यावेळी गिरीगोसावी यांनी नाय काही कमी नाही बॅकेचे काम आहे असे म्हणाले व तेथुन बाहेर कोठेतरी निघुन गेले. त्यानंतर मी व पंच नं.01 तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर लागलीच साळुंके साहेब हे मला सापळापुर्व कारवाईबाबत सांगत असताना मी त्यांना ग्रामसेवक गिरीगोसावी यांचेकडे इतर ग्रामपंचायतीचा देखील कार्यभार असल्याने ते आता भेटणार नाहीत तसेच त्याबाबत मी खात्री केल्याने ग्रामसेवक गिरीगोसावी कार्यालयात आल्यानंतर मी आपल्याला कळवित असल्याचे साळुंके साहेबांना सांगितले. त्यामुळे चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दि.13/10/2023 रोजी मी साळुंके साहेबांना कळवुन ग्रामसेवक गिरीगोसावी प्रयाग चिखली ग्रामपंचायत कार्यालयात आल्याचे सांगितले. त्यानंतर साहेबांनी मला पंचगंगा घाट कोल्हापूर येथे येण्यास सांगितले. मी सदर ठिकाणी गेलो त्यावेळी साळुंके साहेब, पंच व त्यांचा स्टाफ तेथे हजर होता.

त्यानंतर साळुंके साहेबांनी सापळा कारवाई सुरू केली सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅन्थ्रासिन लावलेले 2,000/- रूपये माझे शर्टचे डावे खिशात ठेवुन मला योग्य त्या सुचना

देवून ग्रामसेवक गिरीगोसावी यांना भेटण्याकरीता जाण्याचे सांगितले. त्यानंतर रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच नं. 01 असे माझे मोटार सायकलवरून निघालो त्यावेळी माझे पाठोपाठ सापळा पथक आले. मी ग्रामपंचायत कार्यालय, प्रयाग चिखली येथे आलो. त्यावेळी माझे पाठापोठ सापळा पथकाची गाडी ही तेथे आली त्यातुन सापळा पथकातील सर्वजण आजुबाजुला थांबले. मी ग्रामपंचायत कार्यालयात जावुन ग्रामसेवक गिरीगोसावी यांना भेटलो. त्यावेळी आमच्यात गावठाण उतारा, फेरफार याबाबत बोलणे झाले त्यावेळी त्यांनी त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यास उतारा काढणेस सांगितला. त्यावेळी ग्रामसेवक यांनी मला हाताने पैशाबाबत इशारा करून हे कोणाला दिले हे सांगायचे नाही तुमचे तुम्ही काम करायचे आणि मोकळे व्हायचे कळले असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना त्यांनी मागणी केलेले पैसे दिले. त्यावेळी ग्रामसेवक गिरीगोसावी यांनी पैसे डाव्या हाताने घेवुन त्यांचे पॅन्टचे डाव्या खिशात ठेवले. त्यानंतर मला त्यांनी माझ्या नावचा गावठाण उतारा दिला तो घेवुन मी बाहेर आलो व ग्रामसेवक गिरीगोसावी यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच साळुंके साहेब आणि त्यांचा स्टाफ तेथे आला त्यावेळी सापळा पथकाने लाच स्विकारलेल्या रक्कमेसह ग्रामसेवक गिरीगोसावी यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे येवुन पुर्ण करण्यात आली.

तरी मला बॅकेत कर्ज प्रकरण मंजुरी मिळवण्याकरीता माझे राहते घराचा गावठाण उतारा ग्रामपंचायत प्रयाग चिखली, ता.करवीर येथुन मिळणे आवश्यक असल्याने मी उतारा मिळणेकरीता अर्ज केला होता. सदर गावठाण उतारा देण्यासाठी गा्रमपंचायतीचे ग्रामसेवक गिरीगोसावी यांनी माझेकडे 2,000/-रूपयांची अप्रामाणिकपणे मागणी करून माझ्याकडुन त्यांनी बेकायदेशीरपणे 2,000/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने त्यांना ग्रामपंचायत प्रयाग चिखली येथे रंगेहाथ पकडल्याने माझी गोरख दिनकर गिरीगोसावी, वय 50 वर्षे, ग्रामविकास अधिकारी, वर्ग -3, प्रयाग चिखली, ता.करवीर, जि.कोल्हापूर रा.पंत मंदीर जवळ, शिवाजीनगर, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर, मुळ रा. सिंगापूर, ता.पुरंदर, जि.पुणे यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

arvind rangnath kale(I (Inspector)) / pcmh94256 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सही)
ठाणे अमलदार
करवीर पोलीस ठाणे, कोल्हापूर

**Name** (नाव): ar[illegible]

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): pcmh94256